**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्रमांक ०६/२०२१ मध्ये निशाणी ४४ कडे आदेश**

**(CNR No. MHRT080000612021)**

अर्जदारातर्फे निशाणी क्रमांक ४८ कडे दाखल प्रस्तुत अर्जावरील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. सामनेवालातर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

०२. प्रस्तूत प्रकरण हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ (यापुढे संक्षिप्तरीत्या 'अधिनियम' असेच संबोधण्यात आले आहे) अन्वये दाखल करण्यात आले आहे. अर्जदाराने त्या अधिनियमान्वये विविध मागण्या केल्या आहेत.

०३. प्रस्तूतचे प्रकरण पुराव्याकरीता प्रलंबित आहे. अर्जात कथन केलेनुसार मुळ अर्जाच्या शाबीतीकरीता सामनेवाला क्र. ०१ हा स्वतः न्यायालयात हजर राहणे आवश्यक आहे. सदरचा सामनेवाला क्र. ०१ हा त्याच्या मुखत्यारपत्राद्वारे प्रकरणात हजर झाल्याचे दिसुन येते. सामनेवाला क्र. ०१ याचे गैरहजेरीचे कारण दाखवुन इतर सामनेवाला यांनी मुदत मागितलेली नसल्याचे प्रस्तुत सामनेवाला क्र. ०४ व ०५ यांनी स्वतः व सामनेवाला क्र. ०४ यांनी सामनेवाला क्र. ०१ व ०२ यांचे मुखत्यार म्हणुन निशाणी क्र. ४६ कडील म्हणण्यामध्ये नमुद केले आहे.

०४. प्रकरणात सामनेवाला यांचा पुरावा चालु झाला नाही. निशाणी क्र. १२ कडील अर्ज पाहिला असता, सदर सामनेवाला क्र. ०१ याने तो दुबई येथे नोकरीस असल्याने स्वतः न्यायालयात येवुन हजर राहणे त्याला शक्य नसल्याचे त्यामध्ये नमुद केले आहे. सदरच्या अर्जावर यापुर्वीच दिनांक १६/११/२०२१ रोजी आदेश झाला आहे. अर्जदाराचा पुरावा चालु असताना, सामनेवाला क्र. ०१ याच्या प्रत्यक्ष उपस्थितीची सद्य

स्थितीची आवश्यकता वाटत नाही. त्याचेतर्फे सामनेवाला क्र. ०४ हे मुखत्यार म्हणुन न्यायालयात हजर राहते. त्यामुळे, सद्यस्थितीत सामनेवाला क्र. ०१ याची न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक वाटत नाही. सदरची बाब अर्जदाराने यापुर्वी कधीही मांडलेली नाही. प्रकरण साल सन २०२१ मध्ये दाखल आहे. सबब, विना कारण वेळ न घालविता अर्जदाराने प्रकरणात पुरावा देणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे–

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.10.31 16:13:03 +0530

**(रोहिणी आर कुलकर्णी)**

**दिनांक ३०/१०/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**
**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file are same words as per original file.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 30.10.2025 |
| order signed by PO.on | :- | 30.10.2025 |
| order uploaded on | :- | 31.10.2025 |